**पिफ फोरम- दिवस चौथा- चित्रपटांच्या पत्रकार परिषदांमधील प्रमुख मुद्दे**

पिफ फोरममध्ये सोमवारी झालेल्या चित्रपटांच्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे-

**चित्रपट- 'खटला-बिटला'- मराठी स्पर्धात्मक विभाग**

चित्रपटाचे दिग्दर्शक परेश मोकाशी, लेखिका मधुगंधा कुलकर्णी, अभिनेते अनिल इंगळे, सुनील अभ्यंकर, अभिनेत्री ज्योती वायदंडे, नेहा शितोळे, संगीतकार नरेंद्र भिडे पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते. त्यांच्याशी 'पिफ'चे क्रिएटिव्ह डिरेक्टर समर नखाते यांनी संवाद साधला.

परेश मोकाशी-

-अनेक विषय आपल्या आजूबाजूला दिसणारे असतात. मधुगंधाच्या डोक्यात अनेक वर्षांपासून 'खटला बिटला'चा विषय होता. दोघांचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न फसतो आणि नंतर त्यांच्यावर एका अतिशीघ्र व अतिविशेष न्यायालयात खटला चालवला जातो असा चित्रपटाचा विषय आहे.

-केवळ गंभीर वा वास्तववादी असा हा चित्रपट नसून एका समस्येकडे वेगळ्या प्रकारे पाहण्याचा हा प्रयत्न आहे.

-चित्रपटातील न्यायालय हे ख-या न्यायालयासारखे दाखवले नसून तिथे ख-या न्यायालयासारखी काटेकोर बंधने नाहीत. म्हणून आम्ही न्यायालयाचे चित्रिकरण करताना कॅमेरा फिरता ठेवला आहे. तर त्या खोलीबाहेरच्या जगात मोकळीक असूनही अनेक अदृष्य बंधने असल्यामुळे तिथे 'स्टिल फ्रेम ट्रीटमेंट' वापरली आहे.

-माणसांच्या जगाप्रमाणे प्राण्यांच्या जगात भेदभावाला थारा नसतो. त्यामुळे  एक प्राण्यांचे जग तर दुसरे माणसांचे जग असाही विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मधुगंधा कुलकर्णी-

-हा विषय संवेदनशील असल्यामुळे चित्रपट लिहिताना त्याचे ४-५ ड्राफ्ट लिहिले गेले. मी व परेश आमचा गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा अहे, परंतु त्याचा चित्रपटाला फायदाच झाला.

आनंद इंगळे-

-या चित्रपटात माझी भूमिका सरकारी वकिलाची असून एका 'स्ट्रगलर' वकिलाची भूमिका साकारणा-या सुनील अभ्यंकर यांच्याबरोबर काम करताना आम्हाला भूमिकेतील काही नवे शोधत 'इंप्रोवाईज' करण्यास खूप वाव मिळाला.

ज्योती वायदंडे-

-मी खरे तर संज्ञापन विभागाची विद्यार्थिनी. अभिनयाचा मला कोणताही अनुभव नसल्यामुळे प्रथम दडपण आले होते, परंतु नंतर ते दूर झाले.

नरेंद्र भिडे-

-या चित्रपटाच्या संगीतात एक प्रकारचे वैचित्र्य, रहस्य आणि विनोद हे सगळेच गरजेचे होते. त्यामुळे हा आव्हानात्मक अनुभव होता. मी या चित्रपटासाठी तयार केलेल्या ३५ ट्यून्स नाकारल्या गेल्यानंतर पाश्चिमात्य संगीतातील 'ऑगमेंटेड स्केल' या कमी ठिकाणी वापरल्या जाणा-या प्रकारातील धून तयार झाली, मंगोलियन थ्रोट सिंगिंगचाही मी वापर केला आणि आम्हाला अपेक्षित असलेला परिणाम त्यातून साधला गेला.

**चित्रपट- 'धप्पा'- भारतीय चित्रपट विभाग**

चित्रपटातील अभिनेते आकाश कांबळे, वृषाली कुलकर्णी आणि निर्माते संकेत शहा पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते.

वृषाली कुलकर्णी- येशू ख्रिस्ताचे व्यक्तिचित्र असलेले नाटक सोसायटीतील मुंलांनी गणेशोत्सवात बसवले म्हणून त्यावर बंदी घालण्यात आल्याची बातमी मागे एकदा वाचनात आली होती. त्यावरील विषय या चित्रपटात हाताळला गेला आहे. चित्रपटाचे लेखन गिरीश कुलकर्णी यांनी केले असून दिग्दर्शन निपुण धर्माधिकारी यांचे आहे. माझी व्यक्तिरेखा मुलांचे नाटक बसवणा-या प्रामाणिक स्वभावाच्या स्त्रीची असून ती संयमीपणे विचार करूनच आजूबाजूच्या परिस्थितीला प्रतिसाद देते. या व्यक्तिरेखेकडून मी संयम शिकले.

आकाश कांबळे हा दिव्यांग अभिनेता म्हणाला की, माझी व्यक्तिरेखा हट्टी व लढण्याची जिद्द असलेली असून मलाही त्यातून खूप शिकायला मिळाले.

संकेत शहा- काही कारणास्तव या चित्रपटास उशीर झाला. चित्रपटाची पटकथा पूर्ण होण्यास ४-५ महिने लागले असून आम्ही ४३० मुलांच्या ऑडिशन घेऊन १९ मुलांची चित्रपटासाठी निवड करण्यात आली.

**चित्रपट- 'वॉकिंग विथ द विंड'- भारतीय चित्रपट विभाग**

निर्मात्या अनू नारंग पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होत्या.

अनू नारंग- या चित्रपटाची कथा लडाखच्या पार्श्वभूमीवर घडते. चित्रपटातील अभिनेतेही लडाखमधील स्थानिक लोक आहेत. आम्ही जेव्हा तिथे चित्रिकरणासाठी गेलो तेव्हा विशेष सोईसुविधा नसताना तंबूत राहून आम्ही चित्रिकरण पूर्ण केले. हा चित्रपट अनेक चित्रपट महोत्सवांमध्ये दाखवला गेला असून त्यास ३ राष्ट्रीय पुरस्कारही मिळाले आहेत. हा चित्रपट वेगळ्या धाटणीचा असल्याने तो चित्रपटगृहात प्रदर्शित करण्यासाठी बनवलेला नाही. परंतु डिजिटल व सॅटेलाईट प्रदर्शनासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. उत्तम पटकथा असेल तर मराठी किंवा इतर कोणत्याही भाषेतील चितरपटाची निर्मिती करण्यास आम्ही तयार आहोत.

**चित्रपट- 'दिठी'- मराठी स्पर्धात्मक विभाग**

चित्रपटाच्या दिग्दर्शिका सुमित्रा भावे, अभिनेते व चित्रपटाचे निर्माते डॉ. मोहन आगाशे, छायालेखक धनंजय कुलकर्णी, संगीतकार पार्थ उमराणी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते.

वर्षानुवर्षे वारी करणा-या एका वारक-याचा मुलगा जेव्हा बुडून मरण पावतो तेव्हा त्याच्या मनात देवाविषयी राग निर्माण होतो. दुःखातून सावरण्याचा प्रयत्न करणारा तो वारकरी एका अडलेल्या गाभण गाईला बाळंतपणासाठी मदत करतो आणि मरण आणि जन्माचा अर्थ त्याला उलगडत जातो. अशी या चित्रपटाची कथा आहे.

सुमित्रा भावे- दि. बा. मोकाशी यांच्या एका कथेवर हा चित्रपट आधारित आहे. त्यातील जगण्यामरण्याचे तत्वज्ञान वेगळ्या प्रकारचे असून गेली ५ ते ७ वर्षे हा विषय डोक्यात होता परंतु कुणी निर्माता भेटत नव्हता. त्यानंतर एक निर्माते तयार झाले परंतु नंतर त्यांना काही अडचणी आल्यामुळे चित्रपट रद्द करावा लागणार अशी स्थिती आली. नंतर चित्रपट निर्मितीचा भार डॉ. मोहन आगाशे यांनी उचलला.

धनंजय कुलकर्णी- आम्ही या गोष्टीला सुसंगत असेच छायालेखन करण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट ख-या लोकेशन्सवर व लहान जागांमध्ये चित्रित झाल्यामुळे प्रकाशयोजना खूप विचारपूर्वक करावी लागली.

पार्थ उमराणी- या चित्रपटातील गाण्यांसाठी चित्रपटातील अभिनेते डॉ. मोहन आगाशे, दिलीप प्रभावळकर, किशोर कदम, कैलास वाघमारे यांनी आवाज दिला आहे.

**चित्रपट- 'भोंगा', मराठी स्पर्धात्मक विभाग**

चित्रपटाचे दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील, अभिनेते कपिल कांबळे, श्रीपाद जोशी, दिप्ती धोत्रे, पवन वैद्य पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते.

ही एका मुस्लिम कुटुंबाची गोष्ट आहे. मशिदीच्या समोरच घर असलेल्या या कुटुंबातील अवघ्या काही महिन्यांचे गंभीर आजारी मूल भोंग्यावर होणा-या अजानच्या आवाजामुळे झोपू शकत नसते. हे लक्षात आल्यावर धर्म मोठा की जीव मोठा असा प्रश्न निर्माण होतो. अशी या चित्रपटाची कथा आहे.

शिवाजी लोटन पाटील- माझ्या एका मुस्लिम मित्राकडून मी भोंग्याचा त्रास होत असल्याबद्दल ऐकले होते. मशीद असो किंवा मंदिर, सर्वच प्रकारच्या भोंग्यांचा त्रास होतो. हा प्रश्न चित्रपटातून मांडण्याचा प्रयत्न केला.

दिप्ती धोत्रे- लहान बाळाबरोबर जुळवून घेत काम करणे आव्हानात्मक होते. मला कधी ना कधी मुस्लिम महिलेची व्यक्तिरेखा साकारण्याची इच्छा होती. ती या चित्रपटात पूर्ण झाली. गावातील व शहरातील महिलांच्या बोलण्यावागण्यात फरक असतो. ग्रामीण महिलांच्या देहबोलीचे निरीक्षण करून ते आत्मसात करण्याचा प्रयत्न केला.